2 3 SEP 2025

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सांगलीत एकांकिका स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ प्रथम

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**सांगली :** शिवाजी विद्यापीठाच्या पथकाने सादर केलेल्या चरचरणाऱ्या फँटसीचे युद्ध या एकांकिकेने सांगलीत आयोजित पीएनजी महाकरंडक एकांकिका स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. मंगळवारी रात्री उशिरा स्पर्धेतील विजेते घोषित करून पीएनजीचे संचालक सिद्धार्थ गाडगीळ यांच्या हस्ते पुरस्कार वितरित करण्यात आले. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या सांगली शाखेने या स्पर्धेचे आयोजन केले होते.



पीएनजी महाकरंडक एकांकिका स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली.

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाने सादर केलेली चरचरणाऱ्या फँटसीचे युद्ध ही एकांकिका अव्वल ठरली. स्पर्धेतील अन्य विजेते असे - द्वितीय क्रमांक - मॉडर्न महाविद्यालय, पुणे - वामन आख्यान; तृतीय क्रमांक - प्रेम की यातना, संगमनेर महाविद्यालय, सोलापूर; उत्तेजनार्थ पहिला- मराठवाडा मित्र मंडळाचे शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय, पुणे. बोहाडा; देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर - ग्वाही;

दिग्दर्शन विभागात कादंबरी माळी यांना प्रथम क्रमांक, तर अनिकेत खरात, दीपक शिंदे यांना दुसरा व तिसरा क्रमांक जाहीर करण्यात आला. स्त्री अभिनयामध्ये कादंबरी माळी यांना पहिला, केतकी भाळवणकर यांना दुसरा, अक्षता बारटक्के यांना तिसरा क्रमांक मिळाला. पूर्वा जोतावर, संयोगिता चौधरी, वैष्णवी कुंभार, स्वरा जोग व मृणाल पाटील यांना बक्षीस देण्यात आले.

पुरुष अभिनयामध्ये जैद शेख यांना प्रथम पुरस्कार, तर प्रांजल पडळकर, मुकुल ढेकळे यांना दुसरा व तिसरा क्रमांक देण्यात आला. अभिनव तोरणे, अभिषेक हिरेमठ, भूषण चांदणे, राजस बर्वे यांना उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात आला.

बक्षीस वितरणावेळी संदीप पाटील, मुकुंद पटवर्धन, चंद्रकांत धामणीकर, प्रा. डॉ. भास्कर ताम्हणकर, डॉ. शरद कराळे, स्पर्धा समितीचे अध्यक्ष सचिन पारेख, कार्यवाह विशाल कुलकर्णी आणि शशांक लिमये आदी उपस्थित होते.

2 3 SEP 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रियांच्या योगदानाची नोंद

**शिवाजी विद्यापीठातील (कै) श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनातर्फे आज (मंगळवारी) 'कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया : भाग - २' या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. त्यानिमित्त...**

**■ प्रा. डॉ. भारती पाटील**

गेल्या तीस-चाळीस वर्षांत, स्त्रीवादी इतिहासलेखनाने इतिहासाची मांडणी, स्त्रीवादी दृष्टिकोनातून करायला सुरुवात केलीच, शिवाय स्त्रियांचा इतिहास, स्त्रियांचे इतिहासातील योगदानही मांडायलाही सुरुवात केली. 'हिस्ट्री' केवळ 'हिज'' (त्याची) 'स्टोरी'' (कथा) नसून 'हर'' (तिची) 'स्टोरी' (कथा) सुद्धा आहे. त्याचे भान याच स्त्रीवादी इतिहासलेखनाने दिले. यातूनच इतिहासकार, स्त्रियांचे इतिहासातील योगदान मांडू लागले. स्त्रीवादी दृष्टिकोनातून इतिहासाची पुनर्मांडणी होऊ लागली. नवे संदर्भ शोधले जाऊ लागले, तर जुने पुन्हा तपासले जाऊ लागले. परिणामी, तोपर्यंत अंधारात राहिलेल्या स्त्रियांचे कार्यकर्तृत्व उजेडात येऊ लागले. 'कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया : भाग- २'' हे पुस्तक या प्रयत्नाचाच एक बिंदू आहे.

ब्रिटिशविरोधी लढ्यातील काही महत्त्वाच्या स्त्रियांचे योगदान प्रस्तुत पुस्तकात समाविष्ट केले आहे. जयाबाई हविरे आणि भागीरथीबाई तांबट यांच्याविषयी डॉ. छाया पोवार यांनी योग्य पुराव्यांसह, लहान-सहान तपशील मांडत लेख लिहून त्यांना योग्य न्याय दिला आहे. स्वातंत्र्य दृष्टिक्षेपात येताच माईसाहेब बावडेकर यांनी कोल्हापुरात बालशिक्षणाचा श्रीगणेशा केला. रत्नमाला घाळी आणि रजनीताई मगदूम यांनी शिक्षण संस्था उभ्या केल्या. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात बुद्धिमत्तेच्या व संशोधनाच्या जोरावर प्र-कुलगुरू पदापर्यंत मजल मारलेल्या प्रा. डॉ. माया पंडितही याच कोल्हापूरच्या मातीत वाढलेल्या, रुजलेल्या. या सर्व स्त्रियांनी कोल्हापूरच्या शिक्षण क्षेत्रात वेगळा ठसा उमटवला.

विमलाबाई बागल हे राजकारणातील एक कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व. जेव्हा स्त्रिया फारशा राजकारणात येत नव्हत्या. त्या काळात सरोजिनीताई खंजिरे यांनी राजकारण, समाजकारण, सहकार, बँकिंग या क्षेत्रांत भरीव योगदान दिले. विधानसभा व लोकसभा या पातळीवर आरक्षण नसतानाही स्वर्गीय बाळासाहेब मानेंच्या सूनबाई निवेदिता माने यांनी राजकारणात प्रवेश केला. १९९० च्या दशकात ज्या स्त्रियांनी राजकारणात प्रवेश करून वेगळेपण सिद्ध केले त्या भारती पोवार आणि हसिना फरास यांनी. वारणानगरला जे सहकारी संस्थांचे जाळे निर्माण झाले, त्याचे नेतृत्व केले शोभाताई कोरे यांनी. स्त्रियांना स्वयंपूर्ण करण्यासाठीच विजयमाला देसाई यांनी महिलांचा भारतातील पहिला साखर कारखाना जिल्ह्यात स्थापन केला. स्त्रियांना स्वयंसिद्ध करणे हा उद्देश उराशी बाळगून कांचनताई परुळेकर यांनी संघर्ष केला. भारताच्या रिझर्व्ह बँकेत डेप्युटी गव्हर्नर पदावर काम केलेली व्यक्ती कोल्हापूरची सून आहे. याचा सर्व कोल्हापूरकरांना सार्थ अभिमान असणे स्वाभाविक. डॉ. उषा थोरात हे या व्यक्तीचे नाव आहे. साधनाताई घाटगे यांच्या 'तेज कुरियर्स' या कंपनीने संपूर्ण भारतात आपले एक वेगळे स्थान निर्माण केले. माहिती व तंत्रज्ञान या क्षेत्रात कोल्हापुरात नवी ओळख निर्माण केली ती अश्विनी दानिगोंड यांनी. डाव्या चळवळीतील सुमित्राताई पाटील, माई ऐतवडेकर, ऊर्मिलाकाकी सबनीस, सुशिलाताई कुलकर्णी, इंदुताई सावंत, सुमन पाटील या त्यापैकी काही तळपत्या तारका. या स्त्रियांचा वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, राजकीय जीवनाचा पट हा त्यांच्या संघर्षाची, त्यागाची, कर्तृत्वाची साक्ष देणारा आहे. हे पुस्तक कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रियांची इतिहासामध्ये नोंद घेतली जावी, या उद्देशाने तयार केले आहेच; परंतु याशिवाय स्थानिक इतिहासाच्या अभ्यासासाठीही हा महत्त्वपूर्ण दस्तऐवज ठरेल, अशी अपेक्षा आहे.